उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील बांधण्यात येणाऱ्या विविध उपयोगी इमारतीच्या संदर्भात घ्यावयाच्या काळजीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२००८/(१३७/०८/साशि-१,
दिनांक : ९ सप्टेंबर, २००८.

## परिपत्रक

" उच्च व तंत्र शिक्षण " या विकास क्षेत्रासाठी विविध स्त्रोतातून दरवर्षी मंजूर करण्यात येणाऱ्या योजनांतर्गत तरतूदीतून जवळपास दोन तृतीयांश एवढा निधी हा या विभागाच्या विविध संचालनालयाच्या अखत्यारीतील बांधकामावर होत असतो. या बांधकामांतर्गत बऱ्याच अंशी महाविद्यालयीन,/ कार्यालयीन इमारती, कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने, विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व प्रयोगशाळांच्या इमारती इत्यादींचा समावेश असतो. मात्र शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, या इमारतींच्या बांधकामांकडे संबंधित प्राचार्य, [illegible] व विभागीय सहसंचालकांकडून पुरेसे लक्ष दिले जात नाही. कारण सहसा अशा बांधकामासाठी आवश्यक शासकीय वा खाजगी जमीन प्राधान्याने मिळविण्यासाठी अथवा [illegible] अंदाजपत्रक तयार करण्यासाठी सक्रिय प्रयत्न केले जात नाहीत किंवा बांधकामाच्या प्रगतीबाबत सुध्दा पुरेसा पाठपुरावा वेळोवेळी केल्या जात नाही असेही दिसून आले आहे. त्यामुळे परिणामतः संदरहू इमारती वेळेवर उपलब्ध होत नाहीत वा विलंबामुळे त्यावरील होणाऱ्या खर्चात वाढ होऊन शासनाचे आर्थिक दायित्व अकारण वाढत जाते. या खेरीज ज्या इमारती बांधल्या जातात त्याच्या एकंदरीत सभोवतालच्या परिसराकडे सुध्दा लक्ष दिले जात नाही, किंवा बांधकामाचा दर्जा, सौंदर्य, दर्शनीभाग, अंतर्गत सुविधा, पर्यावरण इत्यादींकडे दुर्लक्ष केले जात आहे. तसेच अशा इमारतींमध्ये सौर ऊर्जेवर चालणारी सयंत्रे / उपकरणे इत्यादींचा वापर किंवा पावसाच्या पाण्याचा निचरा करुन त्याचा वापर करण्याची सोय इत्यादी सारख्या विविध उपाययोजनांचा सुध्दा अभाव अशा इमारतींमध्ये आढळून आला आहे.

२. वरील परिस्थितीत शासन खालील सूचना देत आहे :-

(अ) इमारतीच्या बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग हे केवळ अभिकर्ता असून या इमारतींची मालकी मात्र ही उच्च व तंत्रशिक्षण विभागाची असते हे लक्षात ठेवावे. त्यामुळे अशा इमारतीच्या बांधकामाशी निगडीत या विभागातील संबंधीत सर्व संस्थाप्रमुख / प्राचार्य / विभागीय सहसंचालक / विभागप्रमुख / संचालक यांनी या बांधकामांकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

(ब) अशा बांधकामासाठी केवळ नकाशे /अंदाजपत्रके तयार करुन घेणे, प्रशासकीय मंजूरी मिळविणे व त्यासाठी निधीची उपलब्धता करणे एवढया पुरतीच मर्यादित जबाबदारी न ठेवता अशा इमारतीच्या बांधकामाची संपूर्ण जबाबदारी ओळखून बांधकामाच्या प्रत्येक टप्प्यावरील प्रगतीमध्ये संपूर्ण सहभाग राहील हे सर्वांनी पहावे.

(क) बांधकामाशी संबंधीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांशी वेळोवेळी संपर्क साधून इमारतीचे बांधकाम गरजेनुसार, मानकानुसार, टाईप प्लॅन नुसार झाले / होत आहे किंवा कसे, याबाबत वेळोवेळी बांधकामाच्या जागी प्रत्यक्ष भेटी देऊन सर्व संबंधीतांनी खात्री करणे आवश्यक आहे. अशा वेळोवेळच्या भेटी / तपासणी संदर्भात नोंदवही ठेवून त्यात वेळोवेळी नोंदी कराव्यात.

(-) या इमारतीच्या बाबत बांधकामाचे नकाशे व अंदाजपत्रके तयार करतानाच उचित काळजी घेऊन दर्शनी भागाचे सौंदर्य, लॅण्ड स्केपिंग, पर्यावरण, पावसाच्या पाण्याचा वापर करण्याची सोय, सौर उर्जेवर चालणारी उपकरणे या व अशा बाहय व अंतर्गत सुविधा इत्यादी बाबतचा अंतर्भाव वेळीच होईल हे पहावे.

(ई) अशा इमारतींच्या बांधकामामध्ये कोणत्याही उणिवा राहिल्यास त्या तात्काळ दूर होतील याबाबत सक्रीय प्रयत्न वेळीच करावेत व त्या खेरीज इमारतीचा ताबा घेतला जाणार नाही याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे.

३. वरील सर्व सूचनांबाबत सर्व संबंधीतांनी योग्य ती काळजी घ्यावी व बांधकामाच्या प्रगतीचा आणि त्यावरील होणाऱ्या खर्चाचा आढावा सुध्दा वेळोवेळी घेऊन त्याचा त्रैमासिक अहवाल संबंधीत संचालक स्तरावरुन शासनास नियमितपणे सादर करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(ज.स.सहारिया)
शासनाचे प्रधान सचिव

प्रति,

१. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
३. संचालक, व्यवसाय शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
४. संचालक, व्यवसाय प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
५. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
६. संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
७. कार्यालयीन सचिव, शिक्षण शुल्क व प्रवेश नियंत्रण समिती, मुंबई,
८. राज्य समन्वय अधिकारी व वि.का.अ. (रा.से.यो.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत माहितीसाठी :-

१. सर्व सह / उपसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
२. सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
३. निवड नस्ती (साशि-१).